# इये वेदांताचिये नगरी

श्री. चंद्रशेखर मुद्‌गल

## गुरुपौर्णिमा

गुरुपौर्णिमेचा दिवस ही शिष्यांच्या जीवनात पर्वणीच! गुरुपरंपरेतील सद्‌गुरूंच्या चरणांच्या परिसस्पर्शाने जीवनाचे सोने करून घेण्याची अलौकिक संधी! भारतीय संस्कृतीत आषाढ पौर्णिमेलाच गुरुपौर्णिमा किंवा व्यास पौर्णिमा म्हणतात. या दिवशी व्यासपूजनाचे विशेष महत्त्व असते.

शुक्रवार दिनांक १५ जुलै २०११ रोजी देवस्थानात गुरुपौर्णिमेचा सोहळा साजरा झाला. सकाळी ५.३० वाजता भगवान श्री दत्तात्रेयांना १११ लिटर दुधाचा महाअभिषेक करण्यात आला. त्याप्रसंगी नारदीय भजनी मंडळाने गायन सेवा रुजू केली.

भक्तांनी सकाळी ६ वाजल्यापासून दर्शनास रांगा लावल्या होत्या. सकाळी ७ वाजता ची आरती संपन्न झाल्यावर दर्शनास सुरुवात झाली. प्रथम वेदविद्यापीठातील विद्यार्थ्यांनी दर्शन घेतले व त्यानंतर भक्तांनी दर्शनास सुरुवात केली.

सकाळी ९ वाजता श्री. मांडके यांनी संकलित केलेल्या 'गुरु: साक्षात् परब्रह्म' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. संकलक श्री. मांडके, प्रकाशन समिती अध्यक्ष व त्यांचे सहकारी आणि विश्वस्त सचिव, यांच्या उपस्थितीत हे पुस्तक प. पू. सद्‌गुरुचरणी अर्पण करण्यात आले.

दुपारच्या आरतीपर्यंत दर्शनाचा ओघ वाढतच होता. सद्‌गुरूंचे अधिष्ठान सुगंधित हार व फुलांनी सुशोभित केले होते. सुंदर, नक्षीदार समया आसनाच्या दोन्ही बाजूस प्रज्वलित होत्या. सद्‌गुरूंची प्रसन्न, स्मित करणारी भावमुद्रा मनामध्ये आनंदाच्या ऊर्मी निर्माण करत होती. काही भक्त सद्‌गुरूंच्या आठवणीने सद्‌गदित होऊन साश्रुनयनांनी आपल्या भावनांना वाट करून देत होते. सद्‌गुरूंचे आशीर्वाद घेऊन भक्त मनोमन गुरुसेवेचे व्रत तहहयात चालू ठेवण्याचा संकल्प करीत होते.

स्त्री व पुरुष दोहोंच्या स्वतंत्र दर्शनरांगा करण्यात आल्या होत्या. दुपारच्या आरतीनंतर थोड्या वेळातच पुन्हा दर्शनास सुरुवात झाली. प्रसाद भोजनाची व्यवस्था श्री दत्तक्षेत्रातच उभारलेल्या भगवान श्री दत्तात्रेय मंडपात करण्यात आली होती. नवीनच उभारण्यात आलेल्या या मंडपाचे उद्‌घाटन व पूजन विश्वस्त श्री. प्रकाश प्रधान यांच्या हस्ते झाले. यावेळी मंडप कामासाठी विशेष परिश्रम घेतलेले श्री. राजूशेट ठाणेकर यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

मंडपाचा आकार मोठा असल्यामुळे सुमारे ७ हजार भक्तांनी प्रसादाचा लाभ घेऊनही कार्यक्रम वेळेत पार पडला. देवस्थानच्या आवारात प्रसादभोजन मिळाल्याने भक्तांना विशेष आनंद वाटला. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे गुरुपौर्णिमेला वेदांत विद्यापीठातील विद्यार्थ्यांना नूतन वस्त्रांचे वाटप करण्यात आले.

दुपारच्या सत्रातील प्रमुख कार्यक्रम म्हणजे सर्व सत्संग मंडळांतर्फे झालेल्या पाद्यपूजा. दुपारी ४ वाजता अधिष्ठान मंडपात प. पू. गुरुदेवांच्या पादुकांच्या पाद्यपूजेस सुरुवात झाली. महाराष्ट्रातील सर्व सत्संग मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पाद्यपूजेत सहभाग घेतला. महाराष्ट्राबाहेरील अहमदाबाद सत्संग मंडळ व अमेरिकेतील सत्संग मंडळ यांचे प्रतिनिधी देखील पाद्यपूजा करण्यासाठी आवर्जून उपस्थित राहिले होते. वेदांत विद्यापीठाचे प्रधान आचार्य श्री. समीहन कोल्हटकर यांनी गुरुचरणांचे पूजन केले. पाद्यपूजा चालू असताना वेदांत विद्यापीठातील विद्यार्थ्यांतर्फे मंत्रघोष करण्यात आला. विश्वस्त मंडळातील सर्व विश्वस्तांनी पाद्यपूजा करून गुरुचरणी सेवा अर्पण केली. त्यानंतर प. पू. गुरुदेवांच्या आशीर्वचनांची ध्वनिफीत सर्व भक्तांना ऐकवण्यात आली. पाद्यपूजेचा कार्यक्रम अत्यंत भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## तपोवनातील शिलान्यास

प. पू. सद्‌गुरूंचे स्मृतिस्थळाचे काम लवकरात लवकर सुरू व्हावे अशी सर्व भक्तांची तीव्र इच्छा होती. गुरुकृपेने सरकार

दरबारची सर्व कामे पूर्ण झाल्याने स्मृतिस्थळाच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा मागील महिन्यात झाला होता. या महिन्यात बुधवार दिनांक २० जुलै २०११ (आषाढ कृष्ण ५ शके १९३३ खरनाम संवत्सर) रोजी शिलान्यासाचा कार्यक्रम करण्यात आला. देवस्थानचे पुरोहित वेदचूडामणी श्री. नवाथे गुरुजी, पुणे व त्यांच्या समवेत असणारे ८ वैदिक ब्राह्मण यांनी नवग्रह स्थापना व वास्तुयाग केला.

प. पू. सद्‌गुरूंच्या सेवेत प्रदीर्घ काळ असणाऱ्या भक्तश्रेष्ठ श्री. प्रभाकर लोंढे यांनी यागाचे यजमानपद भूषविले. त्यांच्या हस्ते नवग्रह स्थापना, वास्तुयाग इत्यादी धार्मिक विधींसह नऊ शिलांचे पूजन करण्यात आले. त्यासाठी ३० कलशांमध्ये विविध ठिकाणाहून आणलेले पवित्र नद्यांचे पाणी भरून त्या कलशांचे पूजन करण्यात आले. ह्या शिलांना विशिष्ट नावे आहेत. १) नंदा २) भद्रा ३) जया ४) रिक्ता ५) अजिता ६) अपराजिता ७) शुक्ला ८) शुभांगिनी ९) धरणी. आठ दिशांना स्थापन केलेल्या या आठ शिलांवर वज्र, गदा, पाश, शक्ती, दंड, अंकुश, खड्ग व त्रिशूळ यांची चित्रे कोरलेली असतात व ह्याद्वारे मुख्य देवतेचे संरक्षण होते. मध्यभागी जी शिला असते तिला 'कूर्मशिला' असे म्हणतात. तिच्यावर नाग, कलश, जल, शंख, कूर्म, मत्स्य, मंडूक इत्यादी चित्रे कोरलेली असतात.

पाठशाळेतील विद्यार्थ्यांच्या हस्ते त्या शिला नियोजित ठिकाणी ठेवण्यात आल्या. त्यानंतर सनई चौघड्याच्या संगीतमय वातावरणात पाठशाळेतील विद्यार्थ्यांनी त्यांचे पूजन केले आणि पुढील बांधकामाच्या दृष्टीने सुरुवात झाली.

याप्रसंगी प्रथेप्रमाणे देवस्थानतर्फे विश्वस्त सचिव यांनी ठेकेदार श्री. एम्. आर. सातपुते व आर्किटेक्ट श्री. राजू सोमपुरा यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. त्यानंतर सर्व भक्तांना प्रसाद देण्यात आला.

ह्या सोहोळ्यास विविध ठिकाणांहून अनेक भक्त, पाठशाळेतील सर्व अध्यापक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते. त्यानंतर प्रसाद वाटप झाले आणि कार्यक्रमाची सांगता झाली.

## रुद्राभिषेक

श्रावण हा शिवोपासनेचा महिना. शिवोपासनेत रुद्राभिषेकास विशेष महत्त्व आहे. श्री दत्त देवस्थानात श्रावण महिन्यात श्रीचंद्रमौलेश्वरावर दररोज त्रिकाल रुद्राभिषेक केला जातो. भक्तांनाही या सेवेमध्ये सहभागी करून घेतले जाते. याशिवाय अनेक भक्तांनी लघुरुद्र, पाद्यपूजा करून आशीर्वाद घेतले.

दत्त देवस्थानमध्ये भक्तांच्या कल्याणार्थ दर महिन्यास निरनिराळ्या प्रकारचे याग होत असतात. त्यानुसार दिनांक ३ ऑगस्ट २०११ दरम्यान 'महारुद्र याग' वेदमूर्ती श्री. नवाथे गुरुजी यांच्या अधिपत्याखाली व १२ ब्रह्मवृंदांच्या सहयोगाने करण्यात आला. विश्वस्त श्री. श्रीकांत कवठेकर यांनी या यागाचे यजमानपद भूषविले.

दिनांक १३ ऑगस्ट २०११ रोजी नारळी पौर्णिमेनिमित्त पाठशाळेतील प्रधान अध्यापक वेदमूर्ती श्री. समीहन कोल्हटकर गुरुजी यांनी ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद शाखेतील विद्यार्थ्यांची श्रावणी केली.

## श्रीकृष्ण जयंती

श्रावण कृष्ण अष्टमी म्हणजेच रविवार दिनांक २१ ऑगस्ट २०११ रोजी श्रीकृष्ण जयंतीचा उत्सव संपन्न झाला. पहाटे श्रीकृष्णाच्या मूर्तीची षोडशोपचारे पूजा करण्यात आली. सायंकाळी चांदीच्या देव्हाऱ्यात सुवर्णालंकारांनी सजवलेली श्रीकृष्णाची मूर्ती विराजमान करण्यात आली.

देवघराची पार्श्वभूमी रंगीबेरंगी, आकर्षक फुलांच्या माळांनी व पुष्पगुच्छांनी महिरपीच्या आकारात सजविण्यात आली होती. श्रीकृष्णाचे मुरली मनोहराचे लोभसवाणे रूप मनाला मोहून टाकत होते.

सायंकाळच्या आरतीनंतर रात्री ८ वाजता गायन-वादन सेवेस प्रारंभ झाला. औरंगाबाद येथील सौ. सारिका कुलकर्णी व त्यांचे सहकाऱ्यांनी गायनसेवा रुजू केली. सुमधुर आणि सुश्राव्य गायन सेवेने भक्त भारावून गेले होते. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी औरंगाबाद सत्संग मंडळाने विशेष परिश्रम घेतले. यानंतर अहमदनगर महिला सत्संग मंडळाने भजनसेवा सादर केली.

रात्री ११.३० वाजता भगवान श्रीकृष्णांच्या पूजेस प्रारंभ झाला. वेदमंत्राच्या घोषात पूजा होऊन जन्मोत्सव साजरा करण्यात आला. पाळणा म्हटल्यानंतर भगवान श्रीकृष्ण की जय' चा नारा होऊन भक्तांनी दर्शन घेतले. दर्शनानंतर उपस्थित भक्तांना सुंठवडा (पंजिरी) व बर्फीचा प्रसाद वाटण्यात आला.

## पोळा

दिनांक २८ ऑगस्ट २०११ रोजी श्रावण अमावास्येला देवस्थानात पोळा सण साजरा करण्यात आला. त्यानिमित्त श्रीमन् नृसिंह सरस्वती तपोवन येथील गोशाळेतील गायींची विधिवत् पूजा करण्यात आली आणि गायींना पुरणपोळी, बटाटा व सफरचंद यांचा गोग्रास देण्यात आला.